देशदूत यूट्युब चॅनलसाठी क्यूआर कोड स्कॅन करा
YouTube
www.deshdoot.com

शिल्पकार विकासाचा...
देशदूत

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नाशिक | वर्ष ५६ । अंक ३२७ । रविवार, दि. ३ ऑगस्ट २०२५ । पाने १२ | किंमत ₹ ५

राज-का-रण

आत्मनिर्भरतेचे असेही 'मिशन' !

जिल्हा परिषदेतील 'बाबूंच्या राज्या'मुळे या स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये सद्यस्थितीत एककल्ली प्रशासकीय व्यवस्थेचे दुर्दैवी चित्र दिसते आहे. सर्वसामान्य लोकप्रतिनिधी तर सोडाच, ज्येष्ठ मंत्र्यांनादेखील ही मंडळी प्रतिसाद देत नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या माध्यमातून झालेल्या अनेक उत्तम उपक्रमांवरही पाणी फेरले गेल्याचे म्हणावे लागेल.

वाचा शब्दगंधमध्ये

हिंदीचा कळवळा

शेकापच्या व्यासपीठावर राज ठाकरे यांचा मुख्यमंत्र्यांवर हल्लाबोल

पनवेल । वृत्तसंस्था

राज्याच्या मुख्यमंत्र्यांना हिंदीचा कळवळा आला आहे. महाराष्ट्रात हिंदी कशी आणता येईल याचा विचार करत आहेत, बाहेरून येणाऱ्यांना मराठी कशी शिकवता येईल याचा विचार करत नाही. मी हिंदी भाषिक नाही. गुजराती असल्याचे देशाचा गृहमंत्री सांगतो, मग राज ठाकरे बोलतो तेव्हा संकुचित कसा? अशा शब्दात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी फडणवीसांच्या हिंदी सक्तीवर प्रहार केला. शेकापच्या वर्धापनदिनी माजी आमदार जयंत पाटील यांच्याकडून राज ठाकरे आणि शिवसेना खासदार संजय राऊत यांना निमंत्रित करण्यात आले होते. यावेळी बोलताना राज ठाकरे यांनी भाजपवर घणाघाती हल्ला चढवला.

हिंदीच्या सक्तीवरूनही राज ठाकरे यांनी गुजरातचे उदाहरण देत फडणवीसांच्या भूमिकेचा समाचार घेतला. ते म्हणाले, गुजरातमध्ये आहे का हिंदी? सक्तीमागील याचे राजकारण समजून घेतले पाहिजे. तसेच देशाचे पंतप्रधान, गृहमंत्री दोघेही गुजरातचे आहेत. अमित शहा स्वत: एका मुलाखतीत मी गुजराती आहे, हिंदी भाषिक नाही असे सांगतात. महाराष्ट्रातले अनेक प्रकल्प आज गुजरातला जातायेत. प्रत्येकाला आपल्या राज्याबद्दल प्रेम असते मग आम्ही संकुचित कसे? हिंदी गुजरातमध्ये सक्तीची नाही मग महाराष्ट्रात का? भाषा संपली आणि जमीन गेली की जगाच्या पाठीवर तुम्हाला कसलेही स्थान नाही. गुजरातमध्ये कायद्यानुसार जे गुजराती नाहीत, अधिवासी भारतीयांना थेट शेत जमीन विकत घेता येत नाही. ज्या राज्याचे पंतप्रधान, गृहमंत्री गुजरातचे आहेत, तिथली शेतजमीन भारतातील कुठलाही नागरिक विकत घेऊ शकत नाही. जर जमीन विकत घ्यायची असेल तर एक विशिष्ट कायदा आहे त्यानुसार परवानगी घ्यावी लागते. आज आपल्याकडे कुणीही जमीन विकत घेतो. आमचेच लोक जमिनी विकतायेत. यातून आपणच संपणार हे आपल्या लोकांच्या लक्षात येत नाही, अशी खंत राज ठाकरे यांनी व्यक्त केली.

मराठी माणूस आणि गुजराती माणसांमध्ये भांडण लावावे यासाठी उद्योग सुरू आहेत. तुम्हाला हवे ते आम्ही करणार नाही परंतु ज्यावेळी समजेल तुमच्या कृतीतून महाराष्ट्राला नख लागतेय त्यावेळी अंगावर येऊ. कान बंद ठेवू नका, डोळे बंद ठेवू नका. आपल्या आजूबाजूला काय सुरू आहे त्यावर बारीक लक्ष ठेवले पाहिजे. तुम्ही विकले जातायेत, पायाखालची जमीन निसटतेय. भाषा जातेय मग कालांतराने डोक्यावर पश्चातापाचा हात मारावा लागेल. तुमच्या प्रत्येकाकडे पैसे आले पाहिजे. कुटुंब उभी राहिली पाहिजे पण महाराष्ट्र विकून नाही, असेही राज ठाकरे यांनी सांगितले.

अटक करून दाखवाच

राज ठाकरे यांनी जनसुरक्षा कायद्यावरूनही राज्य सरकारला थेट आव्हान दिले. ते म्हणाले, तुम्ही कोण आहात तर अर्बन नक्षल आहात. कोणत्या प्रकल्पाला विरोध केला तर सरकार अटक करेल. अटक करूनच पाहा, मराठी माणसाच्या थडग्यावर उद्योग उभे राहू देणार नाही. उद्योग आणायचे असतील तर मराठी माणसांना त्यात सामावून घ्यावे लागेल असे सांगत राज ठाकरे यांनी जनसुरक्षा कायद्यावर टीकास्त्र सोडले.

रायगडाचा विचार करा

राज ठाकरे म्हणाले की, कोणत्याही पक्षाचा विचार न करता राज्यकर्त्यांचे लक्ष नसेल तर प्रदेश बरबाद व्हायला वेळ लागत नाही. याचे भीषण उदाहरण रायगड जिल्हा झाला आहे. रायगडच्या जमिनी कुठे जात आहेत? जयंतराव, रायगडची जबाबदारी घ्या, असे आवाहन त्यांनी केले.

वादग्रस्त वक्तव्य

"सामाजिक न्यायभवनाच्या वसतिगृहासाठी तुम्ही ५, १० किंवा १५ कोटी अशी कितीही रक्कम मागा, आपण लगेच मंजूर करू. सरकारचा पैसा आहे, आपल्या बापाचं काय जातंय."

■ संजय शिरसाट
मंत्री, शिंदे गट

थोडक्यात

दहावीच्या विद्यार्थ्याचा संशयास्पद मृत्यू

नाशिक । सातपूर येथील अशोकनगर भागात एका खासगी कोचिंग क्लासेसच्या बाहेर शनिवारी (दि.२) सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांमध्ये झालेल्या वादातून यशराज तुकाराम गांगुर्डे (१६) या विद्यार्थ्याचा संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना घडली. या घटनेनंतर शहरात खळबळ उडाली असून रात्री उशिरापर्यंत सातपूर पोलीस सखोल तपास करत होते. याबाबत सध्या आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

मानधनात वाढ

मुंबई । भारत निवडणूक आयोगाने मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांचे वार्षिक मानधन दुप्पट करण्याचा तसेच बीएलओ पर्यवेक्षकांचे मानधन वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. याशिवाय मतदार नोंदणी अधिकारी (ईआरओ) आणि सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी (एईआरओ) यांना प्रथमच मानधन देण्यात येणार आहे.

बिबट्याचा हल्ला

अंबासन । शेवरे गावातील एका महिलेवर बिबट्याने अचानक हल्ला करत गंभीर जखमी केल्याची घटना आज दुपारी १२ वाजेच्या सुमारास घडली. मनीषा राजेंद्र सोनवणे (३२) असे जखमी महिलेचे नाव आहे. शेतात मका निंदणीचे काम करत असताना अचानक झुडपातून बिबट्याने झडप घेत महिलेवर हल्ला केला. बिबट्याने कपाळावर, डोळ्याजवळ, गालावर आणि हातावर हल्ला करत गंभीर जखमा केल्या.

सोने-चांदी

सोने (प्रति १० ग्रॅम)	
२४ कॅरेट	९९,८००
२२ कॅरेट	९१,८२०
चांदी (प्रतिकिलो) १,१२,०००	

तापमान

किमान : २१.९°
कमाल : २८.३

कांदा भाव

किमान : ६००
कमाल : १६१९
सरासरी : १३३०

मिश्किली

विश्वविजेतीचा सन्मान

◉ जागतिक बुद्धिबळ स्पर्धा विश्वविजेती ग्रँडमास्टर दिव्या देशमुखचा शालेय शिक्षण व क्रीडा विभाग आणि महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूरमध्ये नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दिव्याचा सन्मान करत तीन कोटी रुपयांचे तर महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेकडूनही ११ लाख रुपयांचे बक्षीस प्रदान करण्यात आले.

गद्दार विकले जातील, निष्ठावान नाही

मुंबई । प्रतिनिधी

अनेक जण शिवसेना आणि उद्धव ठाकरेला संपवायला निघाले होते, तरी ते संपले नाहीत. कारण आयुष्यात प्रामाणिकपणा विकत घेतला जाऊ शकत नाही. सर्वच माणसे पैशाने विकले जात नाहीत. गद्दार पैशाने विकले जात असतील, पण निष्ठावान विकले जाऊ शकत नाही, अशा शब्दात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी शनिवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटावर नाव न घेता निशाणा साधला.

शिंदे गटावर ठाकरेंचा निशाणा

आगामी महापालिका निवडणुकीच्या तोंडावर ठाकरे गट आणि मनसेच्या युतीची चर्चा सुरू असतानाच आज शेतकरी क्रांती संघटनेचे ठाकरे गटात विलिनीकरण करण्यात आले. त्यावेळी बोलताना ठाकरे यांनी शिंदे गट आणि भाजपला लक्ष्य केले.

रमी खेळणारा क्रीडामंत्री झाला

विधिमंडळात मोबाईलवर रमी खेळतानाचा व्हायरल झालेल्या व्हिडिओमुळे वादात सापडलेले माणिकराव कोकाटे यांचे खाते बदलून त्यांना क्रीडामंत्री केले. त्यावरून उद्धव ठाकरे यांनी कोकाटे यांना चिमटे काढले. आज एक व्यंगचित्र आले आहे. त्यात रमी आणि तीन पत्ती ऑलिम्पिकमध्ये घेण्याची मागणी होईल, असे म्हटले आहे. कारण जो विषय आहे त्याप्रमाणे खाते दिले गेले असावे. कृषिमंत्री असताना कोकाटे शेतकऱ्यांची थट्टा, मस्करी करत होते. आता रमी खेळणारा माणूस क्रीडामंत्री झाला, असा टोला ठाकरेंनी लगावला.

प्रज्ज्वल रेवण्णा यांना अत्याचारप्रकरणी जन्मठेप

बंगळुरू । वृत्तसंस्था

कर्नाटकमधील जनता दल सेक्युलर पक्षाचे माजी खासदार आणि माजी पंतप्रधान एच.डी. देवेगौडा यांचे नातू प्रज्ज्वल रेवण्णा यांना न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

फार्म हाऊसमध्ये काम करणाऱ्या महिलेवरील बलात्कारप्रकरणी प्रज्ज्वल रेवण्णावर विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. गेल्या वर्षभरापासून याप्रकरणी न्यायालयीन खटला सुरू होता. बंगळुरू येथील विशेष न्यायालयाचे न्यायाधीश संतोष गजानन भट यांनी आज रेवण्णाला जन्मठेपेची शिक्षा सुनावली. प्रज्ज्वल रेवण्णा यास दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे. त्यामुळे जनता दल सेक्युलर पक्षाला हा मोठा झटका मानला जातो.

चाकातून धूर निघाल्याने कामायनी एक्स्प्रेसला खोळंबा

घोटी । प्रतिनिधी

मुंबई टर्मिनसहून बलियाकडे जाणाऱ्या कामायनी एक्स्प्रेसच्या इंजिनच्या चाकांना अचानक ब्रेक लागल्यामुळे त्यातून धूर निघाला. त्यामुळे रेल्वेचालकाने तत्काळ गाडी थांबवली. त्यामुळे पुढील अनर्थ टळला. या प्रकारामुळे मुंढेगावजवळ गाडीचा खोळंबा झाला .

इंजिनच्या खालून धूर निघत असल्याचे पाहून काही प्रवाशांनी घाबरून एक्स्प्रेसमधून खाली उड्या घेतल्या. रेल्वे इंजिनजवळ गर्दी केली. मात्र फक्त चाकाच्या ब्रेक लायनरमधून धूर निघत असल्याचे पाहून सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला. दहा मिनिटांनंतर कामायनी एक्सप्रेस नाशिकरोडकडे रवाना झाली.

मोदींचे नाव घेण्यासाठी छळ केला : प्रज्ञासिंह

मुंबई । वृत्तसंस्था

मालेगाव बॉम्बस्फोटप्रकरणी एनआयएच्या विशेष न्यायालयाने निर्दोष मुक्तता केल्यानंतर माजी भाजप खासदार साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर यांनी आपले अनुभव माध्यमांसमोर कथन केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, आरएसएस प्रमुख मोहन भागवत आणि इतरांचे नाव घेण्यासाठी माझ्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला होता, असा आरोप त्यांनी तपास अधिकाऱ्यांवर केला आहे.

प्रज्ञासिंह ठाकूर यांनी दिलेल्या माहितीनुसार, तपास करणाऱ्या अधिकाऱ्यांनी मला भाजपचे ज्येष्ठ नेते राम माधव यांच्यासह अनेक लोकांची नावे सांगण्यास सांगितले. त्यांनी हे सर्व करण्यासाठी मला छळले. माझे फुफ्फुस निकामी झाले, मला रुग्णालयात बेकायदेशीरपणे ताब्यात ठेवण्यात आले.

मराठा आरक्षणाने इतरांवर अतिक्रमण

- उच्च न्यायालयात दावा
- पुढील सुनावणी २० ऑगस्टला

मुंबई । प्रतिनिधी

राज्य सरकारने दिलेले मराठा आरक्षण हे एकूण आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडणारे आहे. राज्यातील सर्वच क्षेत्रात मराठा समाजाचे वर्चस्व आहे, असे असताना मराठा समाज मागासलेला कसा? असा प्रश्न याचिकाकर्त्यांनी उच्च न्यायालयात उपस्थित करताना मराठा आरक्षणाने इतर समाजाच्या आरक्षणावर अतिक्रमण केल्याचा दावा केला. त्याची नोंद घेत खंडपीठाने या प्रकरणाची पुढील सुनावणी २० ऑगस्टपर्यंत तहकूब केली.

राज्यातील मराठा समाजाला नोकरी आणि शिक्षणात १० टक्के आरक्षण देण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर शनिवारी न्यायमूर्ती रवींद्र घुगे, न्यायमूर्ती एन. जे. जमादार, न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या विशेष पूर्णपीठासमोर सुनावणी झाली.

तिसऱ्या सुनावणीच्या वेळी याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ वकील प्रदीप संचेती यांनी मराठा समाजाला नोकरी व शिक्षणामध्ये सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्गातून (एसईबीसी) १० टक्के आरक्षण देण्याच्या निर्णयाला जोरदार आक्षेप घेतला.

राज्य सरकारच्या वतीने ॲडव्होकेट जनरल डॉ. बिरेंद्र सराफ यांनी हा दावा फेटाळला.

राष्ट्रवादी काँग्रेसचा शिवसेनेला धक्का

मुंबई । वृत्तसंस्था

महायुतीमधील मित्रपक्षांमध्ये सध्या नेत्यांची पळवापळवी सुरू आहे. अजित पवार यांनी रायगड जिल्ह्याचा दौरा केला. त्यांच्या उपस्थितीत शिवसेनेचे प्रवक्ते आणि मंत्री भरतशेठ गोगावले यांचे विश्वासू असणारे ॲड. राजीव साबळे यांनी शिवसेनेचा धनुष्यबाण सोडून राष्ट्रवादीचे घड्याळ हाती घेतले. बारा वर्षांनंतर साबळेंनी पुन्हा राष्ट्रवादीचा झेंडा हाती घेतला.

पोलिसांवर नव्हे, अज्ञातांवर गुन्हा

परभणी । वृत्तसंस्था

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाप्रमाणे आणि मृत सोमनाथ सूर्यवंशी यांची आई विजयाबाई सूर्यवंशी यांच्या १८ डिसेंबर २०२५ च्या अर्जावरून दिलेल्या फिर्यादीत सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणात मध्यरात्री नवा मोंढा पोलीस ठाण्यात अज्ञाताविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे सुपूर्द करण्यात आला आहे.

सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरण

बुधवारी याबाबत सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिल्यानंतर ही प्रक्रिया झाली. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवलेल्या औरंगाबाद उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पोलिसांवर गुन्हा दाखल झाला नसून अज्ञातांवर गुन्हा दाखल करण्यात आल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

परभणीत १० डिसेंबरला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसरात संविधान प्रतिकृतीचा अवमान झाल्याची घटना घडली होती. यानंतर दुसऱ्या दिवशी आंदोलनादरम्यान ११ डिसेंबरला शहरात मोठ्या प्रमाणावर तणाव निर्माण झाला होता. या घटनेदरम्यान सोमनाथ सूर्यवंशी याला पोलिसांनी ताब्यात घेतले होते. त्यास पोलीस ठाण्यात नेले होते. यानंतर सोमनाथ सूर्यवंशी याचा न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाला होता.

सायबर चोरट्यांचे पाऊल पोलिसांपेक्षा पुढेच!

संडे अँकर | अत्याधुनिक तंत्रज्ञान तरीही गुन्ह्याचा छडा लावण्यात अपयश

- नाशिकमध्ये ९९० गुन्हे
- फक्त अकराच संशयित गजाआड

नाशिक । भारत पगारे

सायबर गुन्ह्यांची जनजागृती सुरू असल्याने बहुसंख्य नागरिक व तरुण सायबर साक्षर झाले आहेत बहुदा होत आहेत. असे असतानाही उच्चशिक्षित सायबर चोरटे त्यांनाही जाळ्यात ओढत असून यात डॉक्टर, उद्योजक, सेवानिवृत्तांसह वयोवृद्ध महिलांचा सहभाग अधिक आहे. अद्ययावत तपास यंत्रणा आणि लॅब असतानाही सायबर गुन्ह्यांचे प्रमाण तुलनेने वाढतेच आहे. त्यामुळे आता आपणच अधिकाधिक सतर्कता बाळगणे हाच त्यावरील शेवटचा उपाय असल्याचे अधोरेखित होत आहे. नाशिकमध्ये मे २०२५ अखेर १२५ जणांना अडीच कोटी रुपयांचा गंडा घालण्यात आला आहे.

पान ८ वर

"सायबर गुन्हेगारांचे नेटवर्क परदेशात असल्याने तपासाला मर्यादा येतात. याशिवाय देशांतर्गत गुन्ह्यांमध्ये संशयित इतर राज्यांमधून गुन्हे करतात. त्यामुळे सायबर चोरट्यांची पाळेमुळे खोदून काढण्यासाठी काही सुधारणा आवश्यक आहेत. बँकिंग प्रणालीतदेखील काही बदल अपेक्षित आहेत. एका व्यक्तीच्या नावे एकच मोबाईल सीमकार्ड हा नियम हवा.

■ सुभाष ढवळे,
वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सायबर.

शेतकरी कायद्यावर जेटलींनी धमकावले होते

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी शनिवारी माजी अर्थमंत्री अरुण जेटली यांच्यावर शेतकरी कायद्याला आणि सरकारला विरोध केल्याबद्दल धमकी दिल्याचा आरोप केला. राहुल म्हणाले, मला आठवते की, जेव्हा मी शेतकरीविरोधी कायद्यांविरुद्ध लढत होतो तेव्हा अरुण जेटलींना मला धमकावण्यासाठी पाठवण्यात आले होते.

राहुल गांधी यांचा आरोप

नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे काँग्रेसकडून राष्ट्रीय कायदेशीर परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी काँग्रेस खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आपल्या भाषणात कृषी कायद्यांबद्दल बोलताना दिवंगत माजी मंत्री अरुण जेटली यांच्यावर गंभीर आरोप केले. त्यानंतर लगेचच अरुण जेटली यांच्या मुलाने एक्स पोस्टवरून प्रत्युत्तर दिले आहे.